# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-२६६७/२०२२

**अपिलार्थी, श्री.प्रमोद यशवंत नाखवा,**
**६ ओंकार, सावरकर नगर, मिठबंदर रोड,**
**ठाणे (पूर्व), जि.ठाणे ४०० ६०३.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा. पणन अधिकारी (गृहनिर्माण), सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,३रा मजला, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पणन अधिकारी (गृहनिर्माण ), सिडको शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, ३रा मजला, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक** : २०.१.२०२६

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १२.५.२०२२ | १३.७.२०२२ | २८.६.२०२२ | ---- |

अपिलार्थी यांनी दि.९.९.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २०.१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. शितल प्रसाद काटवटे, सहा. पणन अधिकारी, सिडको, रायगड विभाग, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. श्वेता ईश्वरा वाडेकर, वसाहत अधिकारी, शहरसेवा-२ आणि तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी श्री. अभिजीत राठोड, वसाहत अधिकारी, शहरसेवा-१, सिडको हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(डी.आर.एस. ८७ अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जासंबंधी माहिती मिळणेबाबत) "*

*"(जन माहिती अधिकारी तथा क्षेत्राधिकारी यांनी जा. क्र. सिडको/पणन-२/२०२०/१०७५ दि.८.९.२०२० चे पत्रान्वये मा. राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, नवी मुंबई ४००६१४ यांना द्वितीय अपिल क्रमांक १०३६/२०१९ नुसार सदर माहिती सादर केल्यानंतर अपिलार्थी म्हणून (मला) श्री. प्रमोद यशवंत नाखवा यांना सदरहू माहिती निःशुल्क पुरविण्यात येईल याची मी खात्री देता असे मा. राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहलेल्या पत्राचे अनुषंगाने माहितीच्या प्रती (एकूण २० पृष्ठ) कृपया उपलब्ध करण्यात याव्यात.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये " माहिती प्राप्त झालेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि.१२.५.२०२२ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाच्या निर्णयाची प्रत तसेच संबंधित दस्तऐवज आढळून येत नाही असे जा.क्र. सिडको/महाव्यवस्थापक (गृहनिर्माण)/२०२२/९२८ दि.१३.७.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे आपणास कळविले आहे. विहित वेळेत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.२८.६.२०२२ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलात प्रथम अपिलिय अधिकारी यांनी ४५ दिवसांच्या कालावधीत सुनावणी घेतली नाही अथवा त्याबाबत काही कळविले नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी कसूर करत असल्याने झालेल्या अक्षम्य विलंबामुळे तसेच व्यापक हिताचा मुद्दा लक्षात घेता शासन आणि जनता यांच्यामध्ये सौहार्दाचे वातावरण निर्माण व्हावे अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असे सांगण्यात आले की,अपिलार्थी यांना दि.१३.७.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे असे कळविण्यात आले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती, यापूर्वी कार्यालयात सादर केलेली

कागदपत्रे घेऊन आपण कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भेट देऊ शकता. जेणेकरून आपणास आवश्यक असलेली नेमकी माहिती समजून आपणास पुरविणे सुकर होईल.

या संदर्भात विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले पत्र व त्यासंबंधी कागदपत्रे उपलब्ध नव्हती व म्हणून ती कागदपत्रे अपिलार्थीकडून प्राप्त करून घेण्यासाठी वरीलप्रमाणे अपिलार्थीस पत्र दिले होते. तथापि, अपिलार्थींना सदरची माहिती उपलब्ध करून न दिल्याने व यासंबंधी त्यांच्या कार्यालयातदेखील कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने त्या अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून देऊ शकल्या नाहीत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे ज्या माहितीची मागणी केली होती त्या योजनेचा अभिलेख जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसून तो विभागीय कार्यालयांना हस्तांतरीत झालेला आहे. त्यामुळे सदर माहितीचा शोध घेण्यासाठी कालावधी देण्यात यावा अशी जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान आयोगास विनंती केली. सबब, जन माहिती अधिकारी यांची वेळेची विनंती मान्य करण्यात येत आहे. त्यांना ३० दिवसांचा कालावधी देण्यात येत आहे. या कालावधीत त्यांनी सदर माहितीचा शोध घेऊन अपिलार्थींना माहिती विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.३.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २० जानेवारी, २०२६

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**अपिल क्रमांक : के.आर-२६६७/२०२२**

**अपिलार्थी, श्री.प्रमोद यशवंत नाखवा,**

**सुनावणी दिनांक २०.१.२०२६** (In continuation of order dt.१०.११.२०२५)

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. शितल प्रसाद काटवटे, सहा. पणन अधिकारी, सिडको, रायगड भवन, सिडको आणि तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी श्री. अभिजीत राठोड, विकास अधिकारी, शहरसेवा-१, सिडको हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपात्र अर्जदारांना रिफन्ड अदा केलेल्या नोंदणी शुल्काबाबत व रिफन्ड देणेसंबंधी केलेली कार्यवाहीबाबतची माहिती ही लेखा विभागाशी संबंधित असून सदर माहिती तात्काळ पुरविण्याबाबत कळविले असून माहिती अद्याप अप्राप्त आहे.

जन माहिती अधिकारी यांचे हे निवेदन पाहता आदेश लेखा विभागाचे प्रमुख यांनी सदरची माहिती १५ दिवसांच्या कालावधीत सहा. पणन अधिकारी (गृहनिर्माण) यांना पुरवावी व त्यांनी पुढील सुनावणीस त्यांच्या लेखी खुलाशासह सुनावणीस स्वत: उपस्थित राहावे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२१.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० मार्च, २०२६

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**जन माहिती अधिकारी तथा सहा. पणन अधिकारी (गृहनिर्माण), सिडको,**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,३रा मजला,**
**रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.**

**अपिल क्रमांक : के.आर-२६६७/२०२२**

**अपिलार्थी, श्री.प्रमोद यशवंत नाखवा,**

**सुनावणी दिनांक २१.४.२०२६ (In continuation of order dt.१०.३.२०२६)**

**विवेचन**

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी सिडको कार्यालयातर्फे कोणीही उपस्थित नाहीत. सबब, त्यांना पुन्हा सुनावणीची नोटीस काढण्यात यावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.६.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लेखा विभाग,**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,**
**सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. पणन अधिकारी (गृहनिर्माण), सिडको,**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,३रा मजला,**
**रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.**

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,**
**दालन क्र. ५२७ व ५२८, ५ वा मजला,**
**कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

अपिल क्रमांक : के.आर-२६६७/२०२२

अपिलार्थी, श्री.प्रमोद यशवंत नाखवा,

सुनावणी दिनांक ३०.६.२०२६ (In continuation of order dt.२१.४.२०२६)

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. शितल प्रसाद काटवटे, सहा. पणन अधिकारी, सिडको, रायगड भवन, या उपस्थित आहेत.

या प्रकरणी दि.१०.३.२०२६ रोजीच्या सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे निवेदन केले होते की, अपात्र अर्जदारांना रिफन्ड अदा केलेल्या नोंदणी शुल्काबाबत व रिफन्ड देणेसंबंधी केलेली कार्यवाहीबाबतची माहिती ही लेखा विभागाशी संबंधित असून सदर माहिती तात्काळ पुरविण्याबाबत कळविले असून त्यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने ती अपिलार्थींना देण्यात आलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या निवेदनाच्या अनुषंगाने लेखा विभागाच्या प्रमुखांनी सदरची माहिती १५ दिवसांच्या कालावधीत सहा. पणन अधिकारी (गृहनिर्माण) यांना पुरवावी व त्यांनी पुढील सुनावणीस त्यांच्या लेखी खुलाशासह सुनावणीस स्वत: उपस्थित राहावे असे आदेश पारित करण्यात आले होते. तथापि, त्यांनतरसुध्दा लेखा विभागाकडून जन माहिती अधिकारी तथा सहा. पणन अधिकारी (गृहनिर्माण) यांना माहिती पुरविण्यात आलेली नाही व दि.२१.४.२०२६ रोजीच्या सुनावणीस सिडको कार्यालयातर्फे कोणीच उपस्थित राहिले नाहीत म्हणून या प्रकरणाची सुनावणी आजरोजी ठेवण्यात आली होती.

आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. शितल प्रसाद काटवटे, सहा. पणन अधिकारी, सिडको, रायगड भवन या उपस्थित आहेत. त्यांनी असे निवेदन केले कीं, त्यांना वित्त लेखा अधिकारी व मुख्य लेखा विभाग, सिडको यांचेकडून माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे ती अपिलार्थींना पुरविण्यात आलेली नाही.

आयोगाने दि.२१.४.२०२६ रोजीच्या आदेशाची प्रत मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लेखा विभाग, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, सिडको भवन यांना पाठविली होती तसेच आजच्या सुनावणीचे पत्रदेखील त्यांना पाठविले होते. तथापि, ते अजाच्या सुनावणीसही अनुपस्थित आहेत व यासाठी त्यांनी आयोगाची कोणतीही पूर्वपरवानगी घेतलेली नाही.

अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्री. धनराज गरड, मुख्य लेखा अधिकारी, लेखा विभाग,पाचवा मजला, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई तसेच श्रीनिवास मुकलीकर, व्यवस्थापक पणन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, तिसरा मजला, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई या दोघांनीही आयोगाने पाठविलेल्या नोटीसना त्यांनी प्रतिसाद न दिल्याने या प्रकरणी त्यांची उपस्थिती आवश्यक आहे. सबब, त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ (३) (क) नुसार व सिव्हील प्रोसिजर कोड (CPC) नुसार समन्स बजावण्यात येत आहेत. सदर समन्सची बजावणी संबंधित **वरीष्ठ पोलीस निरिक्षक, सी.बी.डी. बेलापूर पोलीस ठाणे,सी.बी.डी, बेलापूर, नवी मुंबई** यांचेमार्फत करण्यात यावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.४.८.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० जून, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. **श्री. धनराज गरड, मुख्य लेखा अधिकारी, लेखा विभाग,**
**पाचवा मजला, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,**
**सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

२. **श्रीनिवास मुकलीकर, व्यवस्थापक पणन अधिकारी,**
**गृहनिर्माण विभाग, तिसरा मजला, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,**
**रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.**

३. **वरीष्ठ पोलीस निरिक्षक,**
**सी.बी.डी. बेलापूर पोलीस ठाणे,**
**सी.बी.डी, बेलापूर, नवी मुंबई -४००६१४**